# Translation

## Department of Marathi

### A Study of Various Dialects in the Adopted Village *Kasvi* (2017-2018)

The Department of Marathi conducted a study of various dialects spoken in the adopted village *Kasvi* on 20/01/2018. Under this study 04 faculties and 25 students of the department participated. The data of 50 families was collected through a questionier.

1) About eight castes were found in Kasvi village. Although each caste did not have its own dialect, it was found that about five dialects were spoken in the village.

2) Although Kasvi village has a specific dialect of a particular caste in the village, it is not seen that the villagers are dealing with the language of the caste. Major transactions are done in Marathi language mixed with *Zadiboli* (dialect).

3) The main language of Kasvi villagers is Marathi and their Marathi is dominated by *Zadiboli* dialect.

4) People of Kasvi village have a special fondness for folklore.

5) The people of Kasvi village are fond of drama; is an important literary genre. They are more interested in plays.

6) The villagers also have a special interest in the literary genre of poetry and they are seen cultivating this interest through various hymns, *kirtans* as well as some other programs and festivals.

7) They are largely aloof from the literary genres of stories and novels.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तावना | ४ |
| ०२. | भाषेची वैशिष्ट्ये | ५ |
| ०३. | भाषा : समाज आणि संस्कृती | ६ |
| ०४. | मराठी भाषेची पार्श्वभूमी | ६ |
| ०५. | महाराष्ट्राचे प्रांतिक भेद | ६ |
| ०६. | आरमोरी परिसरातील विविध बोलीभाषा | ६–७ |
| ०७. | १) गोंडी बोली | ७–८ |
| ०८. | २) झाडी बोली / झाडपी बोली | ८ |
| ०९. | ३) हलबी बोली | ८–९ |
| १०. | ४) कोहळी बोली | १० |
| ११. | ५) परधानी बोली | ११ |
| १२. | ६) गोंडी–माडिया बोली | ११–१२ |
| १३. | दत्तक ग्राम कासवी येथील बोलीभाषा | १२–१४ |
| १४. | ग्रामस्थांची वाङ्मयीन अभिरूची | १४ |
| १५. | स्मारोप | १५ |
| १६. | निष्कर्ष | १६ |
| १६. | परिशिष्टे | १७–२० |


M.G. Art's, Science & late N.P. Commerce College ★Armori★

# दत्तक ग्राम कासवीतील बोलीभाषांचा अभ्यास

*दत्तक ग्राम कासवीतील बोलीभाषांचा अभ्यास हा प्रकल्प बी.ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांनी मराठी विभाग व संशोधन केंद्रातील प्रमुख प्रा. डॉ. विशाखा वंजारी, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. डॉ. विजय रैवतकर, प्रा. खगेश सहारे यांच्या मार्गदर्शनाखाली केला.*

## ❖ प्रस्तावना :—

मानवी समाजाने स्वत:च्या विकासाच्या अवस्थेत एका अतिशय महत्त्वाच्या वस्तूची निर्मिती केली. ती वस्तू म्हणजे भाषा ही होय. भाषा हा शब्द 'भाष्' या संस्कृत धातूपासून बनला आहे. 'भाष्' म्हणजे बोलणे, भाषण करणे असा या संस्कृत धातूचा अर्थ आहे. बोलणे हे मानवी मुखा वाटे निर्माण होणाऱ्या ध्वनीच्या समुहातून आकारास येते. मनातील विचार, कल्पना, भावना व्यक्त करण्यासाठी मानवी मुखातून निघालेल्या ध्वनींचा सार्थ समूह म्हणजे भाषा असे भाषेबद्दल म्हणता येऊ शकते. तर मनातल्या कल्पना शब्दांच्या द्वारा बाहेर प्रकटविण्याचे साधन अथवा बोली म्हणजे भाषा असाही अर्थ अनेक शब्दकोश देतात. इंग्रजी भाषेत Language या मूळ शब्दात Lingua हा लॅटीन शब्द आहे. Lingua या लॅटीन शब्दाचा मूळ अर्थ Speech किंवा Tounge असा आहे. आंगिक हावभावाची भाषा म्हणजे डोळे मिचकावणे, नाक मुरडणे, दात दाखविणे, बोटे मोडणे, वाकुल्या दाखविणे, मिशीवर हात फिरविणे इत्यादी सुद्धा हावभावाचीच भाषा आहे. तर रेल्वेचे हिरवे तांबडे लाईट, धर्म ध्वज, तोफांचा आवाज, दिव्यांची आरास इत्यादी संकेत हे चिन्हांची भाषा दर्शवितात.

पूर्वी दगळ, विट, भोजपत्र, ताम्रपट, तारपत्र यासारख्या साधनांवर अक्षरांच्या सहाय्याने कोरून काढण्याची कला मानसाने हस्तगत केली होती. पुढे याच कलेचा विकास होऊन लिपीची भाषा तयार झाली. तर करपल्लवी गुप्तचर विभागीय संकेत इत्यादी सारखा सांकेतिक प्रकार सुद्धा भाषाच आहे.

## ➢ भाषेबद्दल इंग्रजी विचारवंतांनी दिलेल्या व्याख्या :—

1) "Language is articulated limited sound organized for the purpose of expression." — **क्रोचे**
2) "A language is a system of arbitrary voice symbol by means of which a society group co-operals." — **ब्लोक**

भाषा ही वारशाने येत असली तरी ती अर्जित संपत्ती आहे. म्हणूनच भाषा ही विविध स्वरूपात परिचयास येते. आईवडिलापासून दुरावलेला मुलगा चुकून विदेशात गेला आणि तिथेच वाढला. तर तो विदेशी भाषा शिकतो. या व्यतिरिक्त समाजानुसारची लोकांची लोकबोली किंवा बोलीभाषा, शासकीय व्यवहाराची भाषा, कला—क्रीडा—खेळ इत्यादींच्या संपर्काने आलेली भाषा अशा विविध स्वरूपात ही भाषा आढळते. यावरून प्रमाणभाषा व बोलीभाषा असे भाषा भेद करावे लागतात.

## ● प्रमाणभाषा :—

शासकीय धोरणानुसार मान्यता प्राप्त आणि सर्वांनी स्वीकारलेली भाषा ती प्रमाणभाषा मानली जाते. यावरून भौगोलिक किंवा सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेल्या विविध भाषा भेदांना एकसंधपणे सामावून घेणाऱ्या भाषेला प्रमाणभाषा म्हणता येईल.

M.G. Art's, Science & late N.P. Commerce College ★Armori★

● **बोलीभाषा :—**

प्रमाणभाषेच्या अवती भवती स्थानपरत्वे काही उपभाषा निर्माण होतात, त्यांना बोली किंवा विभाषा किंवा पोटभाषा म्हणतात. या पोटभाषा व्यवसाय, भौगोलिक सीमा, परंपरा भेद, राजकीय आर्थिक दूरत्वामुळे निर्माण होतात. प्रत्यक्षात समाजातल्या वेगवेगळ्या गटांकडून बोलले जाणारे आणि प्रमाणभाषेशी कमी—अधिक प्रमाणात फरक सांगणारे भाषा भेद किंवा भाषिक रूपे या बोलीभाषेत वापरली जातात.

असे असले तरी प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यात सहसंबंध जाणवतो. एकूणच प्रमाणभाषेमध्ये व्यक्तिसापेक्ष भेद कमी असतात, तर बोलीभाषेमध्ये व्यक्तिसापेक्ष भेद अधिक असतात. बोली आणि प्रमाणभाषा यांचा परस्पर असा संबंध असतो. त्यात कधी साधर्म्य तर कधी वैधर्म्य असते.
उदा. 'पाटील' या शब्दापासून 'पाटलीन' हा शब्द तयार झाला. तर 'अंडेर' या शब्दाचा अर्थ 'मुलगी' असा होतो. तर 'अंडोर' या शब्दाचा अर्थ मुलगा असा होतो.

❖ **भाषेची वैशिष्ट्ये :—**

वरील भाषेच्या स्वरूपावरून भाषेची काही वैशिष्ट्ये दिसून येतात.

**१) ध्वनीमयता :—**

मानवी भाषा ही ध्वनीमय आहे. कारण मानवी शरीरातील विशिष्ट रचनेमुळे मानवाला ध्वनी निर्माण करणे सहज शक्य होते.

**२) भाषा ही अर्जित संपत्ती :—**

भाषा ही कधीच नष्ट होत नाही. त्यामुळे एकदा लिपीबद्ध झालेली भाषा ही त्या भाषेची अर्जित संपत्ती ठरते.

**३) भाषेची विविध रूपे :—**

भाषा ही प्रमाणभाषा, ग्रांथिक भाषा, बोलीभाषा अशा विविध स्वरूपात अस्तित्वात असते. मात्र अस्तित्वात असलेल्या या भाषांपैकी बोलीभाषेत अतिशय जिवंतपणा आढळतो.

**४) भाषा ही सामाजिक संस्था :—**

सामाजिक व्यवहार सुलभ व सरळ करण्यासाठी भाषेचा उपयोग केला जातो. भाषा ही व्यक्तिगत तसेच सामाजिक पातळीवर व्यापक कार्य करते. वाचिक, मौखिक व लिखित स्वरूपाची भाषा ही समाजाचा विकास, प्रगती, संघर्ष, आशा—आकांक्षा यांचे वहण करते. जसे — वेद कालीन भाषा, महाभारत कालीन भाषा, बुद्ध कालीन भाषा आणि यादव कालीन भाषा.

**५) भाषा द्विस्तरीय रचना :—**

भाषा ही मूळ ध्वनींच्या सहाय्याने अगणित आशय सहजपणे व्यक्त करते. जसे क + आ + न = कान. मात्र याच मूळ ध्वनींपासून काना, नाका, कना अशा अनेक आशयाच्या रचना सुद्धा तयार करता येतात.

**६) यादृच्छिकता :—**

भाषेतील शब्द आणि आशय यांचा परस्पर संबंध नसतो. ते संबंध केवळ संकेताने प्राप्त होत असतात. त्यामुळे जुने भाषिक संकेत सोडून गरजेनुसार नवीन संकेत भाषेला देता येवू शकतात.

**७) विशिष्टता :—**

G. Art's, Science & late N.P. Commerce College, Armori

भाषेमध्ये संदेश सूचनांची प्रक्रिया आणि सूचित संदेश यामध्ये काहीतरी संबंध असतो. जसे – 'जेवन तयार आहे', असे घरच्या स्त्रीने म्हणताच जेवायला बोलावले हा अर्थ त्यातून मिळतो. अशाप्रकारे भाषेमध्ये विशिष्ट अर्थ व्यक्त करण्याची क्षमता असते.

**८) निर्मितिशीलता :—**

पूर्वी कधीही न ऐकलेले शब्द, नवी वाक्ये व नव्या रचना भाषा तयार करू शकते. यामुळे भाषेत अनेक आशयाचे वाक्य तयार होतात.

**९) अदलाबदल :—**

भाषेमध्ये एकमेकांच्या भाषिक रचना दुसरी व्यक्ती वापरू शकते आणि या रचना पुन्हा पुन्हा सुद्धा वापरता येतात. भाषेमध्ये अशी अदलाबदल करण्याची क्षमता असते.

**१०) स्थलकालातीतता :—**

भाषा ही स्थल आणि काळ या दोहोंचे बंधन मोडून वेगळा आशय सूचित करू शकते. यामुळे भूतकाळ, न पाहिलेला भविष्यकाळ, न पाहिलेला प्रदेश याच्या वर्णनातून आपल्याला ती स्थिती कळते. जसे – रामायण महाभारत वाचून तत्कालीन संस्कृतीची जाणीव होते.

## ❖ भाषा : समाज आणि संस्कृती :—

बोलीभाषा आणि प्रमाणभाषा यांचा संबंध हा जलाशय समृद्ध करणाऱ्या झऱ्यासारखा आहे. प्रमाणभाषा जलाशय असून बोलीभाषा ह्या पाणी वाहून नेणाऱ्या कालव्यासारख्या असतात. भाषेचा आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाशी आधिक संबंध असतो. वस्तुत: सांस्कृतिक जीवनाचे खरे प्रतितिधित्व भाषा हीच करीत असते.

## ❖ मराठी भाषेची पार्श्वभूमी :—

मराठी भाषा आर्यभाषाकुळातील इंडोआर्यन या गटामध्ये मोडते. २००१ च्या जनगननेनुसार मराठी भाषा ही जगात १० व्या क्रमांकाची भाषा आहे. जगात १२ कोटी जनता मराठी भाषेचा सहज वापर करताना दिसतात. महाराष्ट्रात बोलली जाणारी ही भाषा नर्मदा नदीच्या पलीकडे म्हणजे आजच्या विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण अशा विविध प्रातांमध्ये बोलली जाते. ग्रिअर्सनच्या मते, वेदपूर्वकालीन आणि वैदिककालीन भाषा ह्या एकच भाषा नसून त्या विविध बोलींचे समूह होत्या. त्यापैकीच एका उत्तरकालीन वैदिक बोलीचे व्याकरण रचून पाणिणीने जिला स्थिररूप दिले, ती संस्कृत भाषा होय. याच संस्कृतनंतर पाणिणीय भाषा, त्यानंतर प्राकृत भाषा आणि पुढे अपभ्रंश भाषा अशा मार्गाने मराठी भाषा निर्माण झाली.

मराठी भाषेची उत्पत्ती सांगताना मराठी भाषेचा पहिला उल्लेख हा इ. स. ५०५ मधील वराहमिहिच्या बृहदसंहिता या ग्रंथात महाराष्ट्रीय असा आढळतो. यानंतर युवॉन चॉग या चिनी प्रवाशाने इ. स. ६४१ ला आपल्या प्रवासवर्णनात मों–हा–ला–चा असा महाराष्ट्राचा उल्लेख केला आहे. मार्कंडेयपुराण आणि मत्स्यपुराण यातील उल्लेखानुसार नर्मदेच्या दक्षिण तिरापासून कन्याकुमारीपर्यंत दक्षिणापथ आणि दंडकारण्य प्रदेश आहे. तेथे प्रामुख्याने महाराष्ट्री बोली बोलली जाते.

मराठी भाषेचा पहिला उल्लेख 'कुवलयमाला' या ग्रंथात आलेला आहे. इ. स. ७७८ मध्ये लिहिलेल्या या ग्रंथात 'दडमडह सामलिंगे सहिरे अहिमाने कलहसिले – दिन्नले, गहिल्ले, उल्लविले तत्थमरहट्टे' अशाप्रकारचा उल्लेख आलेला आहे. यानंतर इ. स. ८५९ मध्ये 'धर्मोपदेशमाला' या ग्रंथात 'सललीय–पय–संचारा–पयडियमयना–सुवन्नरमणेला।', 'मरहट्ट भाषा कामिनी य अडविय रेहंती' असा

M.G. Art's, Science & late N.P. Commerce College, Armori

मराठीचा उल्लेख आला आहे. अकराव्या शतकातील 'लिळाचरित्र' या ग्रंथात 'ते मऱ्हाटी तरी अनावर बोलत असेती' असा उल्लेख येतो. तर बाराव्या शतकातील 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथातील बाराव्या अध्यायात 'इये मऱ्हाटीयेचा नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळु करी' असा उल्लेख येतो. एवढेच नव्हे तर संत ज्ञानेश्वर मराठी भाषेचाच देशी भाषा असा उल्लेखही करतात.

## ❖ महाराष्ट्राचे प्रांतिक भेद :—

महाराष्ट्र राज्याची राज्य भाषा मराठी भाषा असली तरी याच मराठी भाषेत प्रांतिक भेद आढळतात. मराठीच्या पोटभाषांच्या अनुषंगाने कोकणी, विजापुरी, धारवाडी, घाटी, संगमेश्वरी, वऱ्हाडी, नागपुरी, झाडी, खानदेशी, अहिराणी, कारवारी, चित्पावनी अशा प्रांतिक भेदानुसार भाषिक भेदही दिसून येतात. यातच पुन्हा महाराष्ट्राच्या पूर्व विदर्भ भागात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि नागपूर ह्या जिल्ह्यांच्या काही भागात झाडीबोली किंवा झाडपी बोली बोलली जात असल्याचे निदर्शनास येते.

## ❖ आरमोरी परिसरातील विविध बोलीभाषा :—

गडचिरोली जिल्हा आणि याच जिल्ह्यातील आरमोरी परिसर झाडीपट्टी परिसरात समाविष्ट होतो. या झाडीपट्टी परिसराचा उल्लेख प्राचीन महानुभाव वाङ्मयात आलेला आहे. डांभ या कृष्णमुनीने 'ऋद्धीपूर महात्म्य' नावाचा ग्रंथ इ. स. १६६६ ला लिहिला. त्यात 'झाडीमंडळापासोनी पश्चिमेशी' या शब्दात झाडीपट्टीचा उल्लेख केलेला आहे. झाडीपट्टी किंवा झाडीमंडळ हा परिसर पूर्व महाराष्ट्रातील व विदर्भ प्रांतात अतीपूर्वेकडे असलेल्या चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा व काही प्रमाणात नागपूर जिल्ह्याचा काही भाग मिळून बनलेला आहे.

झाडीपट्टी किंवा झाडीमंडळात मराठी भाषा बोलणारे अनेक जातीसमूह राहतात. ते सर्व जातीसमूह मराठी भाषाच बोलत असले तरी विविध जाती आणि प्रांताच्या संमिश्रणाने तेथे मराठी भाषेला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे. या परिसरात झारपी बोली (झाडपी बोली), हलबी बोली, कोहळी बोली, कोसरी बोली, परधानी बोली, पारधी बोली, गोंडी, बंगाली, छत्तीसगढी अशा अनेक भाषा बोलणारे समाज आहे. माडिया गोंड, प्रधान, हलबा, कोस्टी, पारधी, महार, कोहळी, कुणबी, माळी इत्यादी जातीही आहेत.

### १) गोंडी बोली :—

गोंडी भाषा ही उत्तर महाराष्ट्र व विदर्भातील काही जिल्ह्यात, महाराष्ट्र व आंध्रच्या भागात, तसेच मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशाच्या भागात बोलली जाणारी भाषा आहे. २००१ च्या जणगणनेनुसार एकूण ५,४३,१२० इतके लोक गोंडी भाषा बोलत होते. प्राचीन काळी गोंडी भाषा ही गोंडवन राज्याची भाषा होती. तिला स्वत:ची लिपी सुद्धा होती, असे गोंडी बोलीभाषेचे अभ्यासक मोतीरावण कंगाली म्हणतात. दक्षिण अमेरिका, आफ्रिका, अंटार्क्टिका, आस्ट्रेलिया व भारत हे पाच खंड एकमेकांच्या जवळ आहेत. या पाच खंडांना अजुनही गोंडवान लॅंड म्हणून संबोधले जाते. तर आदिवासी साहित्याचे अभ्यासक भुजंग मेश्राम हे गोंडी भाषा भारतात द्रविडवंशीय भाषा म्हणून ओळखली जात असल्याचे सांगतात. त्याचप्रमाणे मोहेंजदरो शहरातील उत्खननात मिळालेली बोली ही गोंडी लिपीचीच होय, असे व्यंकटेश आत्राम यांनी मत मांडले आहे.

- **गोंडी बोली नमुना :—**

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College * Armori *

हिद जिमाकी पिटो आदिवासी लोकोत डगुर आसी मंता, पजाटकाल द्रोपो परांदुली भागून रोपो कोषिका रोपोन रउंदी कवयतोर टुडी कबाड किसोर मंता, आदे ना कबाड व चेहरा सुडशी पोयाल राजा हादेन सुडशिन राणी मडमींग किताल. हादेन गाताल रायतारता जन्म आताल. बईद रोपो वाताल पडोर राजकुमारशी तना मर्मी आता. वोर राजकुमार मुजोर मर्मींग आता उपार दुसरे नेटी तरास चावी किता सायना.

(**अर्थ :—** ही पौराणिक कथा गोंड आदिवासी समाजात अलौकिक म्हणून प्रसिद्ध आहे. प्राचीन काळात परूंदली क्षेत्रात कोषाच्या मळ्यात एक सुंदर कामगार कन्या होती. तिचे काम व रूप पाहून कोषालपोय राजा तिच्यावर मोहित झाला आणि त्याने तिला आपली राणी बनविले आणि रायतार हिचा जन्म झाला. रायतार वयात आल्यावर तिचा पडयोर ह्या राजकुमाराशी विवाह झाला. पण जो राजकुमार लग्नानंतर दुसऱ्या दिवशीच सर्पदंशाने मरण पावला.)

**गोंडी कविता**

वरा पिरदी वरा, वरा
बती ढब्बू सले, फेरा फेरा
न आर्का खोटाल, निम आकी घटयाल
मकाकी, जकाकी
वाकी ते, रोतन पुहकी
ना रोतून, कड्क वैनूर
काडेक पुसले, बोर वायानूर?
(उलगुलान — भुजंग मेश्राम)

**अनुवाद**

ये पावसा, ये, ये,
पण पैसे नाहीत, मोठे मोठे
मी पडेन खोटा, तू होशील मोठा
लपशील, खपवशील
येशील तर, घर भिजवशील,
माझ्या झोपडीला, डोळे हजार
अश्रू पुसायला, कोण येणार?

**गोंडी क्रियापदे**

| **गोंडी** | **मराठी** |
|---|---|
| कवाना | हसणे |
| उस्माना | पुसणे |
| सियाणा | देणे |
| अट्टाणा | शिजवणे |
| अरिताना | ओढणे |

**नातेसंबंध**

| **गोंडी** | **मराठी** |
|---|---|
| बाबाल | वडील |
| उकाल | काका |
| कुपयाल | मावशी |
| आयाल | आई |
| छौडा/एडका/चिलका | मुलगा |

**२) झाडी बोली / झाडपी बोली :—**

M.G. Art's, Science & late N.P. Commerce College *Armori*

मराठी साहित्यात महानुभाव वाङ्मयात डींभ कृष्णमुनीने ऋद्धीपूर महात्म नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात 'झाडीमंडळ' या शब्दाचा उल्लेख आलेला आहे. 'झाडीमंडळापासोनी पश्चिमेसी' या शब्दात महाराष्ट्राच्या पूर्वेस असलेला म्हणजेच भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली ह्या जिल्ह्यांचा भाग झाडीमंडळचा परिसर असल्याचे स्पष्ट होते. या झाडीमंडळात मराठी भाषेच्या बोली भाषा म्हणून झारपी (झाडपी), हलबी, कोहळी, कोसरी, परधानी, गोंडी, बंगाली, छत्तीसगडी (गडचिरोली–छत्तीसगड सीमेवरील) अशा अनेक बोली भाषा बोलल्या जातात.

- **झाडी बोली / झाडपी बोली नमुना :–**

आता, तुमीच् सांगा, गाव्चीच् मंडई. सालातून येक गन येते. मंग ते कोनी पाहावाची सोडंल् का? मी नाई बोला. तुमीच् सांगा. मी बोल्‌लू तं नय्‌कतच माजा टोंड् दिस्‌ते. सत्‌रा बकरं कापाल् मुहून्‌स्यानी कोनी मंडई पाहावाच्या भारी घरामंदी बेंड्‌ला रायेल् का, बेंडव्यात्‌ल्या तलंगाय्‌च्या वानी?

(**अर्थ :–** आता, तुम्हीच सांगा, गावचीच जत्रा, वर्षातून एकदा येणारी. मग तिला जायचं कोणी सोडेल का? मी नाही बोलणार. तुम्ही सांगा. मी बोलले तर विनाकारण माझं तोंड दिसतं. पण म्हणून कोणी यात्रा पाहायच्या वेळी घरात कोंडून राहील का खुराड्यातील कोंबडीच्या पिलांसारखा?)

**झाडी क्रियापदे**

| **झाडी** | **मराठी** |
|---|---|
| डकर्‌ना | ओरडणे |
| पाजव्‌ना | धार देणे |
| गाड्‌ना | रोवणे |

**नातेसंबंध**

| **झाडी** | **मराठी** |
|---|---|
| बाप्, बावा | बाप, वडील |
| मा | आई |
| चुल्‌ता, नाना | काका |
| माव्‌सी | मावशी |
| पोर्‌गा, लेक् | मुलगा |

## ३) हलबी बोली :–

हळबी ही वऱ्हाडीचीच एक उपभाषा आहे. ही भाषा बोलणारे हलबी लोक मध्यप्रांताशी संबंधीत असल्याने यांची मराठी भाषा ही हिंदी मिश्रित छत्तीसगडी भाषेकडे झुकणारी आहे. त्यांच्या बोलण्यात काही शब्द तर हिंदी–बंगाली मिश्रितही आढळतात.

आरमोरी तालुक्यात हलबी (डोंगरगाव) नावाचे एक गाव आहे. तेथे आणि आजुबाजूच्या परिसरात हलबा जमातीचे लोक राहतात. 'हलबा' या शब्दाचा अर्थ कन्नड भाषेत 'हरबार' असा होतो. हरबार म्हणजे मूळ रहिवाशी. महाराष्ट्राच्या अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट असलेली ही जात असून, या जातीतील लोक बोलत असलेल्या बोलीस 'हलबी बोली' म्हणतात. मध्यप्रांतातील बस्तर भाग, तसेच चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील काही भागात सुद्धा या जातीचे लोक आढळतात.

- **हळबी बोली नमुना :–**

& late N.P. Commerce College Armori Arts, Science

राजा अन्नमदेव जब वरगलल वस्तरमे इलो, तभी तेचोसंग दंतेश्वरी हलबा, कलार, महार और काही भोई विरादरीचे लोगमन भी इला. माई दंतेश्वरी और भैरमबाबा संखिनी डंखिनी नदीचा संगम किनारे मंदिर मे रहत. तेमन ग भैरनबाबाचो परिवारचो आठझान रहत.

**(अर्थ :—** राजा अमनदेव जेव्हा वारंगलहून बस्तरमध्ये स्थलांतरीत झाले, त्यावेळी भोई समाजाचे लोकसुद्धा आलेत. माई दंतेश्वरी आणि भैरमबाबा संखिनी डंखिनी नद्यांच्या संगम काठावर एका मंदिरात राहत होते. त्यांच्या सोबत भैरमबाबाच्या कुटुंबातील एकूण आठ व्यक्ती होत्या.)

१) मुखया चो घरचो कपार चो तारा चो कुची हाजली
(मुखियाच्या बराच्या दरवाजाच्या ताल्याची चाबी हरवली)

२) अगदर रान होती, आने जाउक होअ बे
(रात्र अधिक झाली, आता गेले पाहिजे)
'जाउक' क्रियापद, 'जा' क्रियापदास 'उक' हा प्रत्यय

- **हलबीचे तीन प्रकार :—**

१) बस्तरीया हलबा — (गडचिरोली सिरोंचा)
२) छत्तीसगीया हलबा — (गडचिरोली, सिरोंचा)
३) मराठीया हलबा — (साकोली, भंडारा, देवरी)

**हलबी क्रियापदे**

| **हलबी** | **मराठी** |
|---|---|
| बदलावून | बदलवून |
| फायदा | फायदा |
| आपलो | आपला |
| लोग | लोगमन (अनेकवचन) |
| जे | जेमन (अनेकवचन) |

**नातेसंबंध**

| **हलबी** | **मराठी** |
|---|---|
| बाबा, दादा | वडील |
| बुगा | आजोबा |
| देर | दीर |
| नंद | नणंद |
| ईवाइ | सोयरा |

## ४) कोहळी बोली :—

चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा जिल्ह्यातील काही भागात, सिंदेवाही—नवरगाव परिसरात, साकोली परिसरात, गोंदिया परिसरातील काही भागात, तसेच मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात कोहळी बोली बोलल्या जाते. कोहळी किंवा कोहरी ही जात शेती करणारी असून ही जात तलाव बांधण्यात कुशल



Arts, Science & Commerce College, Armori

समजून गोंड राजांनी पाचशे वर्षापूर्वी त्यांना काशीहून आणले असल्याची माहिती मिळते. त्यांनी या परिसरात विशालकाय तलावांची निर्मिती केली. आणि त्याच तलावांच्या पाण्यावर भरपूर शेती करून ही जमात मालगुजार आणि श्रीमंत झाली. परंपरागत श्रीमंती आणि ऐशोआरामामुळे ही जमात मनोरंजनाकडे आणि सावकारीकडे वळली. यातून या जातीतील लोकांना मनोरंजन व नाटकांचा छंद जळला. यातील काही रसिकांनी नाट्य निर्मिती करून झाडीपट्टी नाट्य चळवळ उभारली. यात हरिश्चंद्र बोरकर (रेंगेपार), बालाजी बोरकर (नवरगाव), हिरामण लांजे, धनंजय नाकाडे इत्यादींचा आवर्जून उल्लेख करता येतो.

- **कोहळी बोली नमुना :—**

बुहू जुनी काहानी सांगता तुमाल. बुहूच जुनी जसी राज्यारानीची कहानी तसीच हे कहानी. तुमचा इस्वाज नाही बसावाचा. पर..... वद्राचा देव खालत आला. नाई बस ना इस्वाज? त मंग आयका हाई राज्यारानी संसार. पर बिराड इचवाचाच. दोघही नवरा बायको मरतवरी राबराब राबत. पर कर्जात तीनच. आंगावर चिंध्या अना खापाल फाक. माहाद्या ताकतीना वागदेवावानी मरमर राब. गंगूई त्याच्या लायकतीची बायको. आपला नवरा खपते हा तिल चोवत होता. मुहून तेई मनमाने राबं. दोघइ पाटलाचा घरी वनीवर जात. माहाद्या नागऱ्या राये. त गंगू रोवनारीन.

(**अर्थ :—** फार जुनी कहानी सांगतो तुम्हाला. फारच जुनी. जशी राजाराणीची कहानी तशी ही कहानी. तुमचा विश्वास नाही बसणार. पण... वरचा देव खाली आला. नाही विश्वास बसत ना? तर मग ऐका हाही राजाराणीचा संसार... पण बिऱ्हाड विंचवाचं. दोघेही नवराबायको मरेस्तोवर राबायचे. पण कर्माला तीनच. अंगावर चिंध्या अन खायला फाके. महाद्या शक्तीने वाघदेवासारखा, मरमर राबायचा. गंगूशी त्याच्या योग्यतेची बायको आपला नवरा खपतो हे तिला दिसत होते. म्हणून तिही खूप राबायची.)

**कोहळी क्रियापदे**

| **कोहळी** | **मराठी** |
|---|---|
| आचवणे | हात धुणे |
| उद्रवणे | उडविणे |
| चोवना | दिसणे |
| डेंडावणे | हेलकावे घेणे |
| रगदणे | पठविणे |

**नातेसंबंध**

| **कोहळी** | **मराठी** |
|---|---|
| नातीन् | नात |
| माहाल्पी | काकू |
| भाट्वा, भाटो | बहिणीचा नवरा |
| संगी | मित्र |
| भास्या | भाचा |
| डेर् | दीर |

### ५) परधानी बोली :—

धर्मगुरू व प्रधान (मंत्री) या नात्याने वागणारा गोंड जमातीचाच एक विभाग म्हणून परधान जमातीकडे पाहिले जाते. परधान ही गोंड जमातीचीच एक शाखा मानली जाते. मात्र परधानांची बोली ही गोंडी, हिंदी व मराठी मिश्रित असल्याने ती या जमातीच्या नावानुसार 'परधानी बोली' म्हणून ओळखली जाते. नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली या जिल्ह्यांत राहणाऱ्या परधानांच्या भाषेवर वऱ्हाडी व नागपुरी बोलींचा प्रभाव जाणवतो. उदा. — या बोलीत मन्ले (म्हणाले), थ्याले (त्याला), बोंबल्ला (ओरडला), काहाले (कशाला) इत्यादी सारखी मराठीची अपभ्रष्ट रूपे वापरण्याकडे अधिक कल दिसतो.

- **परधानी बोली नमुना :—**

उंदी काळतोपो वारोल आध्यात्मिक तत्वनां आदिवासी तयोर हसे नाकमूड मत्तोर. रोन हरीं तरोपो मून्द मायादू भेटेमा तांगाग. वोर लचोर मून्द बयलोकून जारोल. पूसे मायना. निमेट बागा मानांटिक इदूर पुसी कित्तोर, उन्दी वयलो नावा पोरोल बुद्धी मंता. नना डोक्यात मंतोन. दुसरो वयलो नना पेरल लज्जा मंता, नना कडदून रोपो मनांतोन तिसरो वयलो नना पोरल हिय मंता. नना कारजात नना तोन वोर नान्याल नमस्कार कितोर. मुने पेसीतोर.

(**अर्थ :—** एकदा एक आध्यात्मिक तत्त्वाचा आदिवासी तरूण रस्त्याने चालला होता. त्याला रस्त्यात तीन स्त्रिया भेटल्या. तरूणाने त्या स्त्रियांची नावे विचारली व कुठे राहतात याची चौकशी केली. पहिलीने उत्तर दिले. माझे नाव बुद्धी असून मी डोक्यात राहते. दुसरी म्हणाली, माझे नाव लज्जा असून मी डोळ्यात राहते. तिसरी म्हणाली, माझे नाव हिंमत असून मी हदयात राहते. त्या तरूणाने त्यांना नमस्कार केला व तो पुढे निघाला.

**परधानी क्रियापदे**

| परधानी | मराठी |
|---|---|
| उच्छेतम | बसणे |
| इयना | देणे |
| अस्कीना | कापणे |
| दोहाना | बोधणे |
| मकाना | लपणे |

**नातेसंबंध**

| परधानी | मराठी |
|---|---|
| बाबो | वडील |
| अव्वाल | आई |
| सेलाल | बहीण |
| अक्को | आत्या |
| लमझना | घरजावई |

### ६) गोंडी—माडिया बोली :—

माडियांची वस्ती मुख्यत्वे गडचिरोली जिल्ह्यात आढळते. या जिल्ह्यातील सिरोंचा व एटापल्ली तालुक्यांत व भामरागडच्या पूर्वेला दाट जंगलात विखुरलेली आहे. माडिया जमातीत वस्तीच्या

ठिकाणावरून बडा माडिया व छोटा माडिया असे दोन गट दिसतात. माडिया लोक बोलत असलेल्या भाषेला 'माडिया बोली' म्हणून ओळखले जाते. मात्र माडिया जमातीचे लोक आपल्या भाषेला 'गायता पोल्लो' असे म्हणतात. ही गोंडीचीच पोटभाषा असली तरी सामान्यत: मराठीतील बऱ्याच शब्दांशी माडिया भाषेतील शब्दांचे साधर्म्य दिसते.

तसेच महाराष्ट्रातील माडिया गोंड लोक बाजार, यात्रा व इतर कारणांनी छत्तीसगड तसेच इतरत्र जात असल्याने साहजिकच त्यांच्या भाषेवर इतर भाषांचा त्यात विशेषत: हिंदी भाषेचा प्रभाव अधिक पडलेला दिसून येतो. डॉ. श. गो. देवगावकर गोंडी व माडिया भाषेत कसलाही भेद नसल्याचे मान्य करतात. माडिया ही द्रविडीयन भाषा गटातील एक भाषा असून ती गोंडी भाषेचीच एक बोली आहे. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा या भागास गोंडवन म्हणतात. या प्रदेशावरून गोंडवाना विद्यापीठ हे नाव मिळाले. माडिया गोंडी भाषेवर तेलगू कन्नड व छत्तीसगडी भाषेचा प्रभाव जाणवतो.

- **गोंडी—माडिया नमुना :—**

उंदी कोयासारत रोपो आकाश उंडे. भोमी करूम करूम मनांग. उंदी मातारी चाहाकीत रोपो रोकालदे वंजीग उसेक मता हादू रोकाल आकाशून लागसेक मनेके तान खुप सोंग वाता हादू रोकाल. दे दुसी पाता आकाश लंग सोता आसकोल आकाश करून वाया सिले. नमोट कोयतुर मातारीनेर गोत्र आंदुम. (उषाकिरण आत्राम, चंद्रपूर)

(**अर्थ :—** प्राचीन काळी आकाश जमिनीच्या अगदी जवळ होते. एक मातारी जेव्हा उखळात धान कुटत होती. तेव्हा वारंवार, पुन्हापुन्हा मुसळाला आकाश लागायचे आणि आकाशाला जोराचा धक्का मुसळ द्यायचे. त्यामुळे मातारीला धान कांडायला त्रास व्हायचा. त्यामुळे तिला आभाळाचा खूप राग आला आणि तिने रागातच जोराने मुसळ आकाशावर आदळले. त्यामुळे आकाश घाबरून वर पळाले. तेव्हापासून ते जमिनीपासून दूर गेले. ते पुन्हा खाली आलेच नाही. गोंड लोक त्याच म्हातारीच्या वंशाचे आहेत. (अनुवाद — महादेव आलाम, चंद्रपूर)

**माडिया क्रियापदे**

| माडिया | मराठी |
|---|---|
| रासना | लिहिणे |
| इन्दाना | म्हणणे |
| पोहताना | फेकणे |
| तिन्दाना | खाणे |
| कोयाना | कापणे |

**नातेसंबंध**

| माडिया | मराठी |
|---|---|
| कुची | काकू |
| तम्मो | भाऊ |
| मामल | मामा |
| मयमाड | मुलगी |
| कोकाडी | नणंद |

Arts, Science & late N.P. Commerce College, Armori

## ❖ दत्तक ग्राम कासवी येथील बोलीभाषा :—

कासवी हे गाव महाविद्यालयाने दत्तक घेतले. या गावातील बोलींचा अभ्यास व साहित्यिक अभिरूचीचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासादरम्यान साहित्य व बोलीविषयक विविध वैशिष्ट्ये लक्षात आली. प्रामुख्याने त्या त्या समाजाच्या व जातीच्या बोलीभाषा आढळून आल्या. तथापि सर्वंकषपणे या बोलीभाषांचा मुलाधार झाडीबोली आहे. झाडीबोलीच्या परिप्रेक्षात इतर बोलीभाषा बोलल्या जातात, हे निष्कर्ष हाती येते. गावातील विविध बोलींचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.



**दत्तक ग्राम कासवी येथे विद्यार्थी भाषा आणि साहित्य सर्वेक्षण करताना**

### ➢ कुणबी समाजाची बोली :—

दत्तक ग्राम कासवी येथे बहुतांश लोक हे कुणबी समाजाचे आहेत. या समाजाच्या लोकांची मातृभाषा ही मराठी आहे. ते आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर करीत असले तरी त्यात प्रमाण मराठीतील शब्दांपेक्षा झाडी बोलीतील मराठी शब्दांचाच भरणा अधिक दिसतो. या समाजाचे लोक बरेचशे शब्द उच्चार सुलभतेच्या दृष्टीने प्रमाण मराठीतील शब्दांची अपभ्रष्ट रूपेच अधिक प्रमाणात वापरताना दिसतात. उदा. — मले (मला), तुले (तुला), कोटी (कुठे), कायले (कशाला), अरमोरी (आरमोरी), बरमपुरी (ब्रम्हपुरी), वरदा (वर्धा), नसे (नाही), जेवलू (जेवलो) इत्यादी

### ➢ गोंड समाजाची बोली :—

कासवी येथे कुणबी समाजासोबतच गोंड जमातीचे बरेच कुटुंब आढळले. त्यांची मातृभाषा ही गोंडी भाषा असली तरी गोंडी भाषा बोलणारी जुनी पीढी आता क्वचितच आढळते. मराठी भाषिकांच्या अधिक संपर्कामुळे आज ते आपल्या दैनंदिन व्यवहारात गोंडी भाषा मिश्रित झाडी बोलीभाषेतील मराठी शब्दांचाच अधिक वापर करताना दिसतात. आज हा समाज बऱ्याच प्रमाणात झाडी बोलीचा वापर करीत असल्याने त्यांना गोंडी भाषा बोलणे कठीण जात आहे. ते केवळ धार्मिक विधी व सण समारंभांमध्ये गीतांच्या रूपाने गोंडी बोलीभाषेचा वापर करतांना दिसतात. त्यांच्या बोलण्यातील उच्चाराचा विचार केले असता त्यांचे उच्चार गोंडी प्रभावीत झाडी बोलीतील उच्चार असल्याचे लक्षात आले. या समाजातील

M.G. Arts, Science & Commerce College ★Armori★

लोक गोंडी बोलीतून आपले सांस्कृतिक वैभव जोपासताना दिसतात. मात्र दैनंदिन व्यवहार झाडीबोली मिश्रित मराठी भाषेचाच आहे.

## ➢ परधान समाजाची बोली :—

पूर्व विदर्भात परधान जातीचे लोक मोठ्या प्रमाणात असले तरी कासवी येथे मात्र काही मोजकेच कुटुंब या जातीचे आहेत. यांची मातृभाषा 'परधानी बोली' असली तरी आज यांची मातृभाषा 'मराठी'च झालेली आहे. मात्र बोलतांना कुणबी समाजाच्या शब्दोच्चारासारखी पद्धत यांच्या बोलण्यात आढळत नाही. तर बोलण्याच्या पद्धतीत हिंदी, गोंडी व परधानी बोलीची लयबद्धता आढळून येते. उदा. किंता (किती), आओ (या), येना (ये), मालं (मला), काहाले (कशाला), थ्याले (त्याला) इत्यादी.

## ➢ कोष्टी आणि शिंपी समाजाची बोली :—

कासवी येथे केवळ दोन—तीनच कुटुंबे कोष्टी व शिंपी समाजाची आढळली. मात्र या दोन्ही समाजातील लोकांची स्वतंत्र अशी कोणतीही बोली नसल्याचे लक्षात आले. ते व्यवहारात झाडीबोलीचा वापर अधिक करतात. मराठी भाषा व मराठी भाषिकांचा अधिक सहवास व संपर्कामुळे त्यांना आपल्या बोली भाषेचा पुरेता विसर पडलेला असल्याचे निदर्शनास आले.

## ➢ माळी समाजाची बोली :—

कासवी येथे कुणबी समाजानंतर बऱ्याच प्रमाणात माळी समाजाचे लोक आढळले. या समाजाच्या लोकांचा मुख्य व्यवसाय बागायती शेतीचा आहे. शेतातील हिरवा भाजीपाला रोज तालुक्याच्या बाजारामध्ये विकताना या समाजातील लोकांचा संपर्क विविध भाषिक लोकांशी येतो. त्यामुळेच त्यांची दैनंदिन व्यवहाराची भाषा मराठी असली तरी विविध भाषेतील शब्दांचा वापर त्यांच्या बोलण्यामध्ये दिसून येतो. माळी समाजातील लोक संमिश्र बोली (हिंदी—मराठी—झाडीबोली) बोलतात.

## ➢ कोळी (ढिवर) समाजची बोली :—

कासवी येथे चार—पाच कुटुंबे कोळी (ढिवर) समाजाची आढळली. या समाजाची स्वत: अशी स्वतंत्र कुठलीही बोलीभाषा नसल्याचे आढळले. मात्र त्यांचा मासेमारीचा व्यवसाय असल्याने या व्यवसायाच्या माध्यमाने येणाऱ्या बऱ्याचशा घटकांचा वापर आपल्या बोली भाषेत करताना दिसतात. उदा. तुले बोटऱ्यावानी कापीन, मले गरी लागली इत्यादी.

तसेच माळी समाजाप्रमाणेच कोळी समाजाचाही मासे विक्रीच्या निमित्ताने बाजारातील अनेक भाषिक ग्राहकांशी संपर्क येत असल्याने त्यांचीबी बोलीभाषा संमिश्र बोलीच्याच रूपाने समोर येते.

## ➢ महार (बौद्ध) समाजाची बोली :—

कासवी येथे कुणबी समाजानंतर बऱ्याच प्रमाणात महार समाजाचे लोक असल्याचे दिसून आले. या समाजातील लोक आपल्या दैनंदिन व्यवहारामध्ये मराठीचाच वापर करीत असले तरी ती अपभ्रष्ट मराठीच्या स्वरूपाची आहे. ते आपल्या बोलण्यात अधिकाधिक झाडी बोलीचाच वापर करतात. मात्र बोलताना वाक्यात मराठीतील येणे, जाणे, खाणे, पिणेस अशा क्रियापदांच्या ऐवजी अनुक्रमे येतस, जातस, खातस, पितस यासारखी क्रियापदे वापरतात. याशिवाय मालं (मला), जातून (जातो), याचा (याला) असे विविध शब्द प्रामुख्याने त्यांच्या बोलीभाषेत आढळतात.

Arts, Science & late N.P. Commerce College, Armori

## ❖ ग्रामस्थांची वाङ्मयीन अभिरूची :—

बोलीभाषेच्या अभ्यासाबरोबरच गावातील साहित्यिक अभिरूचीचाही अभ्यास करण्यात आला. त्यात वाचनाची आवड, कोणती पुस्तके वाचायला आवडतात, वाङ्मय प्रकाराची आवड, लोककला यांचा समावेश होता. सर्वेक्षणा दरम्यान असे लक्षात आले की गावातील लोकांना अधिकांश नाटके वाचण्याची व पाहण्याची गोडी आहे. 'माझं कुंकू मिच पुसल', 'कुटुंब', 'भूक', 'बहिण लाडक्या भावाची', 'मरीमायचा भुत्या', 'आत्महत्या', 'लावणी भुलली अभंगाला', 'सुनबाई जागी हो', 'बायको तुझी नजर माझी', 'निष्पाप', 'पाटील बायको सांभाळा', 'बाळा मिच तुझी आई', 'संत तुकाराम', 'उमाजी नाईक', 'संभाजी' अशा सामाजिक, ऐतिहासिक व पौराणिक विषयावरील नाटके पहायला आवडत असल्याचे गावातील लोकांनी सांगितले. गावातील लोकांची नाट्यदृष्ट्या वाङ्मयीन अभिरूची संपन्न असून कादंबरी व कथा या वाङ्मय प्रकारांशी त्यांनी जुळवून घेतले नाही. याविषयी ते अलिप्त असले तरी त्यांना काव्याभिरू व नाट्याभिरूचीची ओढ आहे.

गाव लोककलेनेही संपन्न आहे. गावातील लोकांना लोककल्यांची आवड असल्याने विविध प्रसंगाच्या अनुषंगाने ही मंडळी लोककलांचे आयोजन करीत असतात. दंडार, तमाशा इत्यादी लोककला या भागात प्रसिद्ध आहेत.

## ❖ समारोप :—

दत्तक ग्राम कासवीतील भाषा व साहित्याचे सर्वेक्षण करताना या परिसरातील लोकांच्या बोलीचे नमुने व त्यांना असलेली साहित्यिक आवड याचा अभ्यास करण्यात आला. या प्रकल्प अभ्यासाचे स्वरूप प्रश्नावलीच्या माध्यमाने सर्वेक्षणाचे होते. दत्तक ग्राम कासवीची लोकसंख्या १००० च्या आसपास असल्याकारणाने नमुना म्हणून गावातील २५ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणा अंती गावात कुणबी, गोंड, माळी, कोष्टी, शिंपी, कोळी (ढिवर), महार समाजाचे लोक असल्याचे लक्षात आले. त्या सर्व जाती—जमातींच्या मुळात वेगवेगळ्या बोलीभाषा असल्या तरी त्यांची प्रमुख बोलीभाषा ही झाडीबोलीच आहे. याच बोलीच्या वर्तुळात या सर्व जमातींच्या बोली मोडतात.

बोलीभाषांचा अभ्यास करतानाच ग्रामस्थांचा साहित्य व मुख्य साहित्य प्रकारांसंदर्भातील कलही जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले. तेव्हा गावातील लोकांना नाटक व काव्य या वाङ्मय प्रकाराची ओढ असल्याचे लक्षात आले. मात्र या तुलनेत कथा व कादंबरी या वाङ्मय प्रकारांशी ते जुळवून घेऊ शकले नाहीत. ते मराठी साहित्यापासून बऱ्याच प्रमाणात अलिप्त राहिले असले तरी वाचनाचा छंद ते विविध वृत्तपत्रे वाचनाच्या माध्यमाने जोपासण्याचा प्रयत्न करतात. तसेच लेखनाच्या आवडीमुळे ते स्वत:च्या बोलीभाषेत गीते, भजणे, पाळणे, दंडार—तमाशा करिताचे संवाद इत्यादी लिहून ठेवतात. त्यामुळेच आजच्या घडीला बऱ्याचशा पोटभाषा व बोलीभाषा लुप्त होत असतानाही कासवी ग्रामस्थांच्या बोलीभाषा तग धरून आहेत. जे मराठी साहित्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहे.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli





दत्तक ग्राम कासवी येथे विद्यार्थी भाषा आणि साहित्य सर्वेक्षण करताना

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★Armori★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

## ❖ निष्कर्ष :—

१) कासवी या गावात जवळपास आठ जातीचे लोक आढळून आले. त्यापैकी प्रत्येकच जातीची स्वत:ची बोलीभाषा नसली तरी गावात जवळपास पाच बोलीभाषा बोलल्या जात असल्याचे आढळून आले.

२) कासवी गावातील विशिष्ट जातीची विशिष्ट बोलीभाषा असली तरी ग्रामस्थांकडून जातीच्या भाषेत व्यवहार होताना दिसून येत नाही. प्रमुख व्यवहार झाडीबोली मिश्रीत मराठी भाषेतूनच केले जाता.

३) कासवी ग्रामस्थांची प्रमुख भाषा ही मराठी भाषा असून त्यांच्या या मराठी भाषेचे स्वरूप झाडीबोलीने व्याप्त असे आहे.

४) कासवी गावातील लोकांना लोकसाहित्याची विशेष आवड असून कीर्तन, तमाशा, दंडार याविषयीची अभिरूची त्यांच्यात दिसून आली.

५) कासवी गावातील लोकांना साहित्याची आवड असून नाटक हा वाङ्मयप्रकार त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यांना नाटकांची अधिक आवड आहे.

६) ग्रामस्थांना काव्य या वाङ्मय प्रकाराची सुद्धा विशेष आवड असून ते विविध भजन, कीर्तन तसेच इतर काही कार्यक्रम व सणसमारंभांच्या माध्यमाने ही आवड जोपासताना दिसतात.

७) कथा व कादंबरी या वाङ्मय प्रकारांशी ते बऱ्याच प्रमाणात अलिप्त राहिलेले आहेत.

D. N. Ghumade

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College, Armori

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# परिशिष्टे

**१) प्रश्नावलीचा नमुना :–**

**महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पंजवाणी वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली**
**मराठी विभाग व संशोधन केंद्र**
PBR : 2017 – 18

## भाषा व साहित्य सर्वेक्षण

**दत्तक ग्राम कासवी**
**प्रश्नावली**

१) आपली मातृभाषा कोणती?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

.......................................

२) आपण घरी कोणती बोलीभाषा बोलता?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

.......................................

३) दैनंदिन व्यवहारात आपण कोणत्या भाषेचा अधिक वापर करता?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

.......................................

४) आपणास किती भाषा माहीत आहेत? त्या कोणत्या?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

.......................................

५) आपल्या समाजाची / जातीची भाषा आहे का? असल्यास कोणती?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

.......................................

६) आपणास वाचनाची आवड आहे का? काय वाचता?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

.......................................

७) आपणास कोणती पुस्तके (कथा, कादंबरी, नाटक, कविता) वाचायला आवडतात?

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★Armori★

....................................................................................................................................

....................................................................................................................................

..........................................

८) आपणास नाटक पाहायला आवडते का? आवडलेली नाटके कोणती?

....................................................................................................................................

....................................................................................................................................

..........................................

९) आपल्या गावात लोककलेचे कोणते कार्यक्रम आयोजित केले जातात? आपला सहभाग असतो का?

....................................................................................................................................

....................................................................................................................................

..........................................

**२) भरून घेण्यात आलेल्या प्रश्नावलीचा नमुना :–**

C. Arts, Science & late N.P. Commerce College W.* Armori *

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पंजवाणी वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली
मराठी विभाग व संशोधन केंद्र
PBR : 2017 – 18

# भाषा व साहित्य सर्वेक्षण

दत्तक ग्राम कासवी

## प्रश्नावली

शेषराव वासुदेव कुमरे

१) आपली मातृभाषा कोणती?

मराठी

२) आपण घरी कोणती बोलीभाषा बोलता?

मराठी

३) दैनंदिन व्यवहारात आपण कोणत्या भाषेचा अधिक वापर करता?

मराठी

४) आपणास किती भाषा माहीत आहेत? त्या कोणत्या?

झाडी बोली, मराठी, हिंदी

५) आपल्या समाजाची / जातीची भाषा आहे का? असल्यास कोणती?

होय. गोंडी

६) आपणास वाचनाची आवड आहे का? काय वाचता?

होय. पुस्तके, नाटक

७) आपणास कोणती पुस्तके (कथा, कादंबरी, नाटक, कविता) वाचायला आवडतात?

होय. 'एकच प्याला'

८) आपणास नाटक पाहायला आवडते का? आवडलेली नाटके कोणती?

होय. बाळा मीच तुझी आई, सुनबाई जागी हो, निष्पाप

९) आपल्या गावात लोककलेचे कोणते कार्यक्रम आयोजित केले जातात? आपला सहभाग असतो का?

दंडार, किर्तन, नाटक, धार्मिक कार्यक्रम, होय सहभाग घेतो.

[signature]

विद्यार्थी
[signature]

[signature] [stamp: M.G. Arts, Science ... Commerce College, Armori]

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

## ३) सहभागी विद्यार्थ्यांची यादी :–

**Mahatma Gandhi Arts, Science and Late Nasaruddinbhai Panjwani Commerce College**

Armori Distt. Gadchiroli (M.S.) 441208

**Peoples Biodiversity Register**

**Adopted Village Kasvi, Ta. Armori**

CLASS: BA - II SESSION : 2017-2018

| SR.NO | NAME OF STUDENT | SUBJECTS | Mob. / SIGNATURE |
|---|---|---|---|
| 1 | KU ALKA PRAKASH BORKAR | MARATHI | 9823709765 |
| 2 | MR AMIT VISHWANATH PENDAM | MARATHI | 9423744105 |
| 3 | MR DIPAK DEVSU TUMRETI | MARATHI | 7719824267 |
| 4 | MR GULSHAN RAMDAS ATRAM | MARATHI | 9112878700 |
| 5 | KU KIRANTAI ASHOK EATANKAR | MARATHI | 8805560148 |
| 6 | KU KIRTI KISHOR NAITAM | MARATHI | 9423361097 |
| 7 | KU MAYURI MAHADEO RAMTEKE | MARATHI | 9689121911 |
| 8 | KU MONALI VIJAY KOTHARE | MARATHI | |
| 9 | MR PANKAJ ASHOK KOLHE | MARATHI | 8275793319 |
| 10 | MR PRAFUL ASHOK KULMETHE | MARATHI | 9404794775 |
| 11 | MR PRANAV LAXMAN MADAVI | MARATHI | 9423512850 |
| 12 | KU PRIYA JAGJIVAN RAMTEKE | MARATHI | 8805229601 |
| 13 | KU PRIYANKA TIKARAM TARAM | MARATHI | 9112357428 |
| 14 | KU PRIYANKA TUKARAM LENGURE | MARATHI | 8275415144 |
| 15 | KU PUNAM KEWALRAM MADAVI | MARATHI | 9823550341 |
| 16 | MR RAKESH DHYANESHWAR KARANGAMI | MARATHI | 8275718980 |
| 17 | MR ROSHAN SHALIKRAM GHARAT | MARATHI | 7038635815 |
| 18 | MR RUSHIDEO BARIKRAO NAITAM | MARATHI | 9403779451 |
| 19 | MR SACHIN PURUSHOTTAM MADAVI | MARATHI | 9011904758 |
| 20 | KU SONU ASHOK KUMBHARE | MARATHI | 9637565415 |
| 21 | MR YOGESH JANKIRAM WAKADE | MARATHI | 9404462355 |
| 22 | KU ASHWINI BALKRUSHNA KUMBHILWAR | MARATHI | 9404533625 |
| 23 | KU CHETANA TARACHAND YEDAME | MARATHI | 9767147671 |
| 24. | KU. DAMINI G. CHAPLE | MAR | 9763613574 |
| 25. | Pravin S. Sonde | mar | 7038296417 |

Guide:- Prof. Dr. V. P. Wanjari

Prof. D. M. Ghonmode

Prof. Vijay Raiwatkar

Prof Khagesh Sahare

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

४) वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या बातम्या :—



## कासवीत बोलीभाषा व साहित्य सर्वेक्षण

**आरमोरी :** येथील महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने दत्तक ग्राम कासवी येथे जैवविविधता नोंदवही अंतर्गत गावातील बोलीभाषा व साहित्याचे सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी ५० कुटुंबांना भेट देऊन प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहिती गोळा केली. मातृभाषा, व्यवहाराची भाषा, समाज व जातीची भाषा, बोलीभाषा, विविध भाषेचे ज्ञान, साहित्याची आवड, अभिरूची, नाटकांची आवड यासह विविध बाबी जाणून घेतल्या. याप्रसंगी प्रा. विशाखा वंजारी, प्रा. दिलीप घोनमोडे, डॉ. विजय रेवतकर, प्रा. खगेश सहारे उपस्थित होते. यशस्वीतेसाठी बीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

दैनिक लोकमत वृत्तपत्रात दि. २२ जानेवारी २०१८ ला प्रकाशित बातमी

## कासवी येथे बोलीभाषा व साहित्याचे सर्वेक्षण



**आरमोरी :** येथील महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालयाने दत्तक ग्राम योजनेंतर्गत तालुक्यातील कासवी हे गाव दत्तक घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी लोकांचे जैवविविधता नोंदवही अंतर्गत दत्तक ग्राम कासवी विकास कार्य समितीचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील बोलीभाषा व साहित्याचे सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी मराठी विभाग व संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा. डॉ. विशाखा वंजारी, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा.डॉ. विजय रैवतकर, प्रा. खगेश सहारे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी बोलीभाषा व साहित्याचे सर्वेक्षण केले.

दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रात दि. २२ जानेवारी २०१८ ला प्रकाशित बातमी

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College, Armori

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori Dist - Gadchiroli